# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २३३- २३** **दिनांक : - २७/०७/२०२३**

## मिरा-भाईंदर ,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वतीने सायबर सुरक्षा जनजागृतीकरीता पथनाट्य कार्यक्रमाचे आयोजन.

दिनांक २५.०७.२०२३ रोजी मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या वतीने मा. पोलीस आयुक्त यांचे संकल्पनेतून व मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ ३, विरार यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणे तर्फे जुने विवा कॉलेज, विरार प. येथे गुन्ह्यांना आळा बसवणे करीता सायबर सुरक्षा पथनाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर पथनाट्य स्पर्धेकरीता वसई तालुक्यातील १)विवा कॉलेज (दुसरे वर्ष), २)सेंट जोसेफ कॉलेज, ३)विवा कॉलेज (पहिले वर्ष),४)सह्याद्री कॉलेज ५)विवा इन्स्टीट्युट ऑफ फार्मसी कॉलेज ६)विद्यावर्धीनी कॉलेज ७)विवा इन्स्टीट्युट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज, ८)उत्कर्ष ज्युनीयर कॉलेज (कला) ९)उत्कर्ष ज्युनीयर कॉलेज (विज्ञान) या महाविद्यालयानी भाग घेतला होता. सदर पथनाट्य स्पर्धेमध्ये खालील प्रमाणे संघ विजयी झालेले आहेत.

**१) सेंट जोसेफ कॉलेज सत्पाळा - प्रथम क्रमांक पटकावील्याने त्यांना ५००० रु. रोख व बक्षीस पत्र,**

**२) विवा कॉलेज विरार प. (पहिले वर्ष) – व्दितीय क्रमांक पटकावील्याने त्यांना ३०००/- रु.रोख व बक्षीसपत्र,**

**३) सह्याद्री कॉलेज जुचंद्र – तृतीया क्रमांक पटकावलयाने त्यांना २०००/- रु रोख व बक्षीसपत्र**

वरील विजेत्या संघाना मा. पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचेतर्फे रोख रक्कम व बक्षीसपत्र देवून गौरविण्यात आले. सदर सायबरचे गुन्हे टाळण्याकरीता सदर कार्यक्रमाचे प्रसारण सिग्नेट केबलव्दारे संपुर्ण वसई तालुका व पालघर जिल्ह्यात तसेच युट्युब चॅनल वरती देखील प्रसारित करण्यात आलेले आहे. तसेच सदर कार्यक्रमाची रिल बनवून ती देखील सोशल मिडीयाव्दारे प्रसारित करुन सदर कार्यक्रमाची प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. सदरचा कार्यक्रम हा ३५००० केबल धारकांनी पाहिलेला असून युट्युब व सोशलमिडीयाव्दारे नागरिकांनी पाहिलेला आहे. भविष्यात सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होवून नये करीता सदर कार्यक्रमाची चित्रफीत ही पुढील सहा महिने केबल नेटवर्कवर प्रसिध्द करीत आहोत.

सदर कार्यक्रमाकरीता मिरा-भाईंदर,वसई-विरार आयुक्तालयाचे मा. श्री.मधुकर पाण्डेय, श्रीमती. पोर्णीमा चौगुले-श्रिंगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-२, वसई, श्रीमती पद्मजा बढे सहायक पोलीस आयुक्त वसई विभाग, श्री. विनायक नरळे सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग, श्री. रामचंद्र देशमुख सहायक पोलीस आयुक्त विरार विभाग व परिमंडळ ३ मधील पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. रामचंद्र देशमुख सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे हस्ते करण्यात आलेले असून सदर कार्यक्रमाकरीता श्री. राजीव पाटील, प्रथम महापौर वसई-विरार शहर महानगरपालीका तसेच इतर मान्यवर व ७५० ते ८०० विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थीत होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन श्री.राजेंद्र कांबळे वरिष्ठ पोलीस निरिक्षक, विरार पोलीस ठाणे यांनी केलेले होते. सदरचा कार्यक्रम ११.०० वा सुरु होवून १३.१५ वा. वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री.राजेंद्र कांबळे यांनी सर्व मान्यवरांचे आभार प्रदर्शन करुन राष्ट्रगीताने मा.पोलीस आयुक्त यांचे आदेशान्वये सदरच्या कार्यक्रमाचा सांगता समारोप करण्यात आलेला आहे.




सायबर सुरक्षा जनजागृती
पथनाट्य स्पर्धा - २०२३


सायबर सुरक्षा जनजागृती
पथनाट्य स्पर्धा - २०२३
N.S.S. UNIT

